तत्वाचा बंदा जीव मूर्तीला कोण विचारी ?

# प्रभुतरूण

Keeping the Pathare Prabhu community updated since 1923

MAY 2024 – Issue No. DPT 02

editor.prabhutarun@gmail.com

*From the Editor's Desk*

**कल्पना सुनील राणे**



## शब्दांचा व्यापार

सध्या निवडणुकींच्या धामधुमीत राजकीय प्रवक्ते, समर्थक, विश्लेषक आणि तज्ज्ञांचे बोलणे एकदम खालच्या पातळींवर, हीन दर्जावर गेले आहे. राजकारणी मंडळी काही वाट्टेल ते बोलतात, त्यांचे प्रवक्ते त्याचे समर्थन करतात आणि तज्ज्ञ मंडळी त्यावर चर्चा करतात. गेल्या काही वर्षांत, अशा चर्चांचे गुऱ्हाळ आणि वादविवादांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. ते आपल्यापर्यंत पोहोचवण्यात प्रसार माध्यमांचा खूप मोठा वाटा आहे. या टीव्ही चर्चांमध्ये सहभागी होणारे एकमेकांविरुद्ध वैयक्तिक टीका करतात, आरोप-प्रत्यारोप करतात आणि विरुध्द बोलून प्रेक्षकांची दिशाभूल करतात. त्यात जर उत्तम बोलणारा कोणी तज्ज्ञ असेल तर त्या चॅनलचा अँकर त्याला धड बोलू देता नाही. वर तो अँकरच मोठमोठ्याने आपले बोलणे रेटत राहतो. बातम्या, तथ्ये आणि सत्याची जागा आज गोंगाट, घर्षण आणि भांडणांनी घेतली आहे. स्पर्धा करताना सत्यापेक्षा अर्धसत्याकडे झुकते माप गेले आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि एरवीसुध्दा... असा हा आजचा प्राइम टाइम बनल्याने प्रेक्षकांना त्याचा उबग येत चालला आहे.

या प्राइम टाइममध्ये अनेक प्रतिष्ठित व्यक्तींवर चिखल फेक झाली आहे आणि अजूनही होते आहे. गुन्ह्याचा निकाल देण्यासाठी कोर्ट असताना मिडिया ट्रायल्स झाली आहेत. अनेक नामवंतांचे खऱ्या-खोट्या रील्सने व्हाट्स ॲप गजबजले आहे. पण विकासाबद्दल, देशाच्या हिताबद्दल कोण बोलतच नाही.

या वादविवादांमुळे समाजाचे अपरिमित नुकसान होत आहे का? घरी बसून हे जातीय, राजकीय विषारी वादविवाद पाहणाऱ्या तरूणाईच्या विचारांवर त्याचा परिणाम होत आहे का? कोव्हिडच्या काळात अनेकांनी टीव्ही आणि बातम्यांपासून फारकत घेतली होती. पातळी सोडून बोललेल्या वक्तव्यांवर होणारे विश्लेषण आम्ही का पाहायचे? हे आणि असे अनेक प्रश्न मनात येतात. आजच्या तरूणाईने डिजिटल प्लॅटफॉर्मचा पर्याय निवडला असला तरी येनकेन प्रकरेण या सगळ्या शाब्दिक चकमकी त्यांच्यापर्यंत कोणत्या ना कोणत्या माध्यमातून पोहोचतातच. त्याचा त्यांच्या मनावर नक्कीच प्रभाव पडत असला पाहिजे. जर त्यांनी असत्याला सत्य मानले तर ?

प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. चांगली आणि वाईट. माध्यमांचे सकारात्मक आणि नकारात्मक प्रभाव विचारांना दिशा न दाखवता पोकळ चर्चेची व्यासपीठे बनताना पाहून वाईट वाटते. कारण प्राइम टाइम हा वादविवाद व शाब्दिक खेळांचा आखाडा नाही. त्यातल्या हाय डेसिबल व विषारी शब्दांमुळे जागरूक नागरिक घडवण्याऐवजी नकारात्मक वृत्ती निर्माण होत आहे. तसेच पाहणाऱ्याच्या मनात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. विचारांचा गोंधळ उडाला आहे. निर्णय होण्यात अडथळे निर्माण होत आहे. हा खरा की तो खरा काहीच कळत नाही. याचा परवा होणाऱ्या मतदानावर नक्कीच परिणाम होणार असे वाटते.

शब्द हे जपून वापरावेत कारण शब्द हे एक शस्त्र असल्याचे आतापर्यंत ऐकलेले आहे. मग याच शब्दांची महती लोप पावत चालली आहे का?

प्रसार माध्यम हे समाजबदलाचे साधन आहे. वर्तमानपत्रे आपली भूमिका चोखपणे बजावतात. पण टीव्ही माध्यम जास्त आक्रमक झाले आहे. जनजागृतीमध्ये विविध प्रसार माध्यमांनी मोठे योगदान दिले आहे. माहिती, तंत्रज्ञान, लोकशिक्षण आणि मनोरंजन या वैशिष्ट्यांमुळे त्यांचा समाजमनावर मोठा प्रभाव आहे. त्यामुळे माध्यमावर सत्य सांगण्याची मोठी जबाबदारी आहे.

मानसोपचार तज्ज्ञांच्या मते अशा वादविवादांच्या विषाचा परिणाम अँकर, प्रवक्ते आणि प्रेक्षकांच्या मानसिक आरोग्यावर होतो. ते खूप उत्तेजित होऊन बोलत असल्याने त्यांच्या शारीरिक आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. यासाठी सगळ्या मीडिया हाऊसपासून अँकरपर्यंत आणि प्रवक्त्यापासून श्रोत्यांपर्यंत सर्वांनीच उशीर होण्यापूर्वी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. तसेच बातमीदारी, मतमतांतरे आणि सादरीकरणाच्या साच्यात बदल घडवून आणला पाहिजे.

जाता जाता मला डॉ. सुजाता वीरेश यांची कविता आठवते, त्यातल्या या दोन ओळी...

तेज है तलवार से भी, शब्द की ये धार।

सोच कर के बंधु करना, शब्द का व्यापार।

तलवारीपेक्षाही शब्दांचा प्रवाह, धार तीक्ष्ण असते. विचार करूनच बोलले पाहिजे व शब्दांची देवाणघेवाण केली पाहिजे.

शब्द नावाच्या या दुधारी शस्त्राच्या कटूतेने वैर किंवा दरी निर्माण होऊ नये. कारण हीच दरी गेली काही दशके राजकीय अराजकतेलाही कारणीभूत ठरली आहे आणि त्यामुळे जातीय अंतर वाढत गेले आहे.

शेवटी काय की कोणीही कितीही घसा फोडून बोलला, ठासून सांगत राहिला तरी आपली बुध्दी, आपले निरीक्षण, आपला अनुभव काय सांगतो हे कोणत्याही निष्कर्षाशी पोहोचण्यासाठी पुरेसे आहेत.

तेव्हा भावनेच्या आहारी न जाता येणाऱ्या पिढ्यांच्या भविष्यासाठी विकसनशील नाही तर विकसित भारताची निर्मिती कशी होईल याकडे लक्ष पुरवले गेले पाहिजे.

# अखेरचा निरोप
## प्रकरण पहिले

**संजय शरद दळवी**



“योगा, ए योगा, अगं माझं पाकीट कुठे आहे?” खणात वाखरावाखर करणाऱ्या क्षितिजने ओरडूनच विचारले.“काय रे, उगाच कटकट करतोयस, ते काय गादीवर काढून ठेवलंय मी.” नॅपकिनला हात पुसत किचनमधून बाहेर येत योगिनी उत्तरली.खरंच की गं, मी बघितलंच नाही,” बिछान्यावर ठेवलेल्या पाकीट, पेन आणि रुमालाकडे बघत क्षितिज म्हणाला.

“कोण म्हणेल की हे डॉ. क्षितिज विजयकर आहेत म्हणून?” असे म्हणत योगिनी गमतीने हसली. अंतराळ विज्ञान आणि एरोस्पेसमध्ये एम.एस्सी पदव्युत्तर पदवी मिळवून, वर अंतराळ विज्ञान आणि ग्रहविज्ञान या विषयात डबल पीएच. डी. करून वयाच्या अवघ्या चाळीसाव्या वर्षी बंगलोर येथील इस्रोच्या प्रमुख पदी विराजमान झालेला तो होता डॉ. क्षितिज विनायक विजयकर. मनमिळाऊ, प्रचंड  हुशार आणि तितकाच सरळ. मुंबईतील एका घरंदाज, प्रतिष्ठित व उच्च शिक्षित घरात जन्मलेल्या क्षितिजवर जन्मत: खूप चांगले संस्कार झाले होते. श्रीमंतीत वाढूनही तो सदैव नम्रच राहिला. नासामधून आलेल्या मोठ्या ऑफर नाकारून त्याने इस्रो जॉईन केले, यातच त्याच्या सरळमार्गीपणाची आणि देशभक्तीची कल्पना येऊ शकेल.

क्षितिजचा जन्मच मुंबईचा. तो पार्ल्यात जन्मला आणि वाढला, पार्ले टिळक विद्यालय, पार्ले कॉलेज, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ चेक्नॉलॉजी (आयआयटी), खरगपूर, असा प्रवास  करून क्षितिजने आयुष्यातील एक स्वप्न पुरे केले होते. भारतातील एरोस्पेस अभियांत्रिकीच्या मास्टर्स पदवीधर म्हणून पात्र होण्यासाठी प्रबंध (थिसिस) आणि इंटर्नशिप दोन्ही आवश्यक असतात. हेच दोन घटक, तसेच अद्ययावत अभ्यासक्रम/कोर्सवर्क, विद्यार्थ्यांना एरोस्पेस अभियांत्रिकी पदव्युत्तर करिअरसाठी तयार करतात. हा कोर्स भारतात मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी (एम.टेक.) किंवा मास्टर ऑफ सायन्स (एम.एस.) प्रोग्राम म्हणून ऑफर केला जातो. यातही एम.एस. हा एक पूर्ण संशोधन देणारा मास्टर प्रोग्राम आहे आणि तो कोर्स गोल्डमेडल मिळवून पास व्हायच्या आधीच क्षितिजला नासा आणि इस्रोकडून नोकऱ्यांचे आमंत्रण आले होते, त्यातल्या इस्रोला पसंती देत क्षितिज बंगलोरला शिफ्ट झाला.

नोकरी करतानाच त्याने अंतराळ विज्ञान आणि ग्रह विज्ञान या विषयात डबल पीएच. डी. मिळवली, आणि अल्पावधीतच एरोस्पेस इंजिनीरिंग डिपार्टमेण्टचा चीफ बनला. मधल्या काळात त्याचे कुमारी योगिनी कोठारे हिच्याशी लग्न झाले, आणि त्यांना हेमांगी नावाची एक चार वर्षांची मुलगी आहे. योगिनी सुद्धा व्यवसायाने चार्टर्ड अकौंटंट म्हणजे सीए असून एका नामांकित कंपनीत कामाला होती. योगिनीला लहानपणापासून सांभाळणारी रेवाताई त्यांच्याबरोबर बंगलोरला शिफ्ट झाल्यामुळे हेमाला तिच्याकडे सोपवून योगाला निर्धास्तपणे नोकरी करता येत असे. दोघेही नवरा बायको उच्च शिक्षित, महत्वाकांक्षी आणि कार्यतत्पर असल्यामुळे त्यांची दिवसेंदिवस भरभराट होत होती. नाही म्हणायला दोघांनाही मुंबईची कमी जाणवत असे पण कार्यबाहुल्यामुळे आणि वाढणाऱ्या छोट्या हेमा समवेत त्यांचे दिवस छान व्यतीत होत होते.

“अरे क्षि, आज तर इस्रो बंद आहे ना मग तू कुठे निघालास?” ह्या प्रश्नावर थोडा वैतागत तो म्हणाला, “बाकीचे दिवस मी फ्री नसतो म्हणून आज जाऊन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कामे पेंडिंग पडली आहेत ती जरा संपवून टाकतो. दुपारपर्यंत जेवायला पोचेनच मी बहुतेक. ड्रायव्हरलासुद्धा नाही बोलावलंय आज. शॉर्ट्सवर टीशर्ट चढवत त्याने योगिनीचे ओठावर बोट टेकले आणि तिथेच झोपलेल्या हेमाचे गाल हळूच कुस्करत गाडीच्या चाव्या घेऊन तो दरवाजाकडे वळला.

यू. आर. राव (यूआरएससी) तथा इस्रो उपग्रह केंद्र (आयएसएसी) जिथे भारतीय उपग्रहांची रचना, विकास आणि बांधकाम होते, ते क्षितिजच्या घरापासून जवळच असल्यामुळे आपल्या काळ्याभोर रंगाच्या नव्या कोऱ्या हायब्रीड इनोव्हामधून त्याला स्पेस सेंटर गाठायला अवघी पाच मिनिटेच लागली. रोज सुटाबुटात असणाऱ्या आपल्या साहेबाला शॉर्ट्स व टीशर्टमध्ये बघून हडबडलेल्या सिक्युरिटीकडे हसून पाहात आणि एका वेळी दोन दोन पायऱ्या चढत क्षितिज आपल्या ऑफिसमध्ये पोचला. सतत भरलेल्या त्या मोठ्या कार्यलयात आज अगदी शुकशुकाट होता. पुढे होत त्याने आपली केबिन चावीने उघडली आणि पुढच्या पाचच मिनिटात तो टेबलावरच्या फाईल्समध्ये गुंग होऊन गेला. एका पाठोपाठ एका फाईल्सचा  फडशा पाडत, हव्या त्या ठिकाणी सह्या वा रिमार्क्स मारत साधारणपणे एक वाजेपर्यंत त्याने बहुतेक साऱ्याच गोष्टी मार्गी लावल्या आणि अगदी शेवटची पातळशी फाईल उघडली. त्यात त्याच्या होणाऱ्या पर्सनल असिस्टंट कम सायंटिस्टच्या नावाचे नेमणूक पत्र होते. आता हे ही मीच साइन करू का असा विचार करत त्याने वरचे नाव वाचले, मिस श्वेता मधुकर तळपदे... श्वेता, त्याची माँटेसरी पासूनची सगळ्यात जवळची मैत्रीण, एकेकाळचे त्याचे सर्वस्व. तिचे नाव अजूनही तेच होते म्हणजे तिने लग्न केले नव्हते. त्याने पुढचे पान उलटले, आणि सीव्हीवरतीच चिकटवलेल्या फोटोवर त्याची नजर पडली आणि छातीत एक तीव्र कळ आली.

क्षितीज आणि श्वेता ह्यांच्यात अगदी लहानपणापासूनच एक अतूट असे नाते होते. ते एकाच परिसरात वाढले, एकाच शाळेत शिकले. हायस्कूलमध्ये प्रवेश केल्यावर त्यांच्यातवे बंध अधिकच घट्ट होत गेले. पौगंडावस्थेच्या त्या नाजूक अशा पायरीवर, जिथे प्रेम म्हणजे काय ह्याची पुसटशीही कल्पना नसताना त्यांच्यात एक छान असे मैत्रीचे नाते निर्माण झाले होते. दोघेही एकाच जातीचे, एकाच परिसरात वाढलेले, त्यांच्या घरच्यांची जवळची मैत्री नसली तरी ते सारेच जण एकमेकांना ओळखत होते. त्याचे वडील, विनायकराव विजयकर प्रसिद्ध कायदेपंडित होते, आई सुरेखा प्रथितयश लेखिका होती. श्वेता तीन बहिणीतील थोरली. तिचे वडील एका नामांकित कंपनीत वरच्या पदावर होते. आई मात्र गृहिणी होती. तिच्या दोन्ही धाकट्या बहिणी, वीणा व चित्रा. वीणा मेडिकलला होती तर चित्रा बी.कॉम. करत होती. श्वेता तशी सुखवस्तू घरातली, तर क्षितिज एकुलता एक, प्रचंड आणि पिढीजात श्रीमंत.  पण त्याच्या श्रीमंतीची भिंत त्या दोघात उभी राहू शकतच नव्हती. तसे बघायला गेले तर श्वेता अथवा क्षितिजने कधीही प्रेमाच्या आणाभाका घेतल्या नव्हत्या कारण आपल्यात असे काही नाते निर्माण झाल्याचे दोघांच्याही कधी ध्यानीमनी आले नव्हते. वेगवेगळ्या कॉलेजमध्ये शिकूनही क्षितिज आणि श्वेता यांनी आपलं नातं टिकवून ठेवलं.

ते एकमेकांचे सपोर्ट सिस्टीम बनले होते, तरुण वयातील आव्हानांना एकत्र नेव्हिगेट करत होते. तो आयआयटी, खरगपूर, येथून बी.टेक. करत होता तर ती मुंबईतच के. जे. सोमैय्या कॉलेज मधून बी.टेक. (एरोस्पेस इंजिनीरिंग) करत होती, पण व्हाट्स-अप, इन्स्टा आदी ॲप्सवर तर त्यांचे नेहमीच बोलणे सुरु असे.

मोबाईलच्या रिंगने त्याची तंद्री भंगली. योगिनीचा फोन होता, अरे दोन वाजायला आले, कधी येतो आहेस? आलोच दहा मिनिटांत म्हणत क्षितिजने आवराआवर केली आणि पटकन घरी पोचला. जेवण तयारच होते, पण आज त्याला काही सुचत नव्हते. इतर दिवशी तो योगाला आवरायला मदत करीत असे पण आज जेवल्यावर सिगारेटही न ओढता तो बेडरूममध्ये जाऊन पडला. पाठचे आवरून आलेली योगिनी त्याच्या बाजूला बसली आणि त्याचा हात हातात घेत तिने त्याच्या डोळ्यात खोल रोखून बघितले आणि डोळ्यांनीच प्रश्न केला की काय झाले आहे म्हणून. तिचा हात हळुवारपणे सोडवत क्षितिजने म्हटले, योगा, माझी पर्सनल असिस्टंट कम सायंटिस्ट म्हणून श्वेताची नेमणूक झाली आहे; मग, त्यात एव्हढे डिस्टर्ब होण्यासारखे काय आहे? यू आर क्लीन अँड स्ट्रॉंग टू. ऑलविल गो वेल, म्हणत योगिनी त्याच्या मिठीत शिरली, आणि त्याला जवळ घेत तिने त्याच्या डोक्यावर हळूच थोपटले.

थोड्या वेळात योगिनीचा डोळा लागल्याचे पाहून क्षितिज गॅलेरीत जाऊन उभा राहिला आणि त्याने एक सिगारेट पेटवली, पण त्याच्या डोक्यात मात्र जुन्या प्रसंगांनी जणू फेरच धरला होता.

क्रमशः

- संजय शरद दळवी

# पुनववेणा...

**मुकुला राणे नवलकर**



एक आटपाट नगरी होती.

तेथे एक शूर गुणग्राही राजा आणि त्याची सुखी समाधानी प्रजा रहात होती.

त्या नगरीची होती..एक रुपसंपन्न नगरवधू.

संस्कार आणि शिष्टाचार मंडीत,

सोळा विद्या आणि चौसष्टकला..पारंगत...

आरस्पानी सौंदर्य,नृत्य गायन कुशलता,

काव्य-शास्त्राची उत्तम जाण...

नगरवधू जणू..आटपाटनगरीचा प्राण.

नगरीला दहा वेशीं आणि दहा शोभनीय कमानी.. होत्या..

प्रत्येक कमानी निकट तिचा एक एक  रंगमहाल होता.

नवविध नवरसांनी चिंब उन्मनी अविष्कार तिथे यथावकाश रंगत होते.

राजप्रासादासह राज्यातील अमीर उमराव

नववधूवर जीव ओवाळीत होते.

नगरातील उत्सव प्रिय प्रजा नववधूच्या

सहवासाने आनंदित होत होती.

शब्द रुप रस गंध स्पर्श यांची रंगपंचीम नगरात नेहमीच साजरी होत होती.

अशाच एका प्रसन्न प्रहरी,रंगमहालाच्या सौंधावर,

ती आपल्या सखीसह गुजगोष्टी करीत..

निवांत होती.

रोजनिशीच्या आपल्या दैनंदिन व्यवहारात सारी प्रजा रमली होती.

राजवाडा आपल्या दिनक्रमात व्यस्त होता.

तेव्हां नगरीच्या अंतस्थ वाटेवर,

दूरवरून एक ठिपका,

आपल्या गतीने जवळ येऊ लागला.

दिशांचे ज्ञान,भवतालच भानं,

स्थल कालाचे अनुसंधान..हरपून,

सहजच पुढे पुढे येत राहिला.

तो एक केशरी वस्त्रातील भिक्षू होता.

रिक्त,अनासक्त,अलिप्त असा तो भिक्षू,

विहरत मार्ग क्रमीत होता.

नगरीच्या दिनमानात हे वर्तमान अघटित होते.

नानाविध गंधभारली,सप्तरंगी चमचमती,

नवरसात चिंब ओलेती नगरी,या दृष्याने अचंबित झाली आणि नगरवधू दिग्मूढ !!

अवचित आलेल्या या विस्मयकारी ...,

अनाहूत पाहुण्याचे घटकाभर अप्रूप करीत प्रजा पुन्हा आपल्या आयुष्यांकडे वळली,

पण नगरवधूच्या मनात मात्र पराकाष्ठेची अस्वस्थता होती.

सौंधाच्या कठड्याशी जाताना तिने खूण केली आणि सखी तत्काल धावली तेव्हा, तो भिक्षू महालाचे वळण ओलांडत होता.

त्याची वाट अडवत मोठ्या विनयाने सखीने आपल्या स्वामिनीचा निरोप त्याला दिला.

तत्क्षणी आपली गती रोखत तो भिख्खू थांबला आणि मंद स्वरात म्हणाला, .....

“ही ती वेळ नव्हे ..ह्या घडीला देवींचे नियोजित कर्तव्य,त्यांची वाट पाहते आहे.”

ते कोणते भन्ते?सखीने आश्चर्याने विचारले.

तेव्हां तो भिक्षू अपलक नजरेने आणि स्थिर सौम्य वाणीने उत्तरंला,

“देवी ते जाणतात आणि उत्तम तऱ्हेने पारही पाडीत आहेत.

आणिक जेव्हां त्यांना या उत्तरदायित्वातून निवृत्ती मिळेल,

तेव्हां या आमंत्रणाचे प्रयोजन ही उरणार नाही...!”

इतके बोलून भिक्षू मार्गस्थ झाला.

सखी वळली आणि धावत जाऊन,तिने सारे संभाषण आपल्या स्वामिनीला

अवगत केले.

एक क्षणभर नगरवधू विचारात हरवली..,
दुसऱ्याचं क्षणी तिला,
त्या भिक्षूच्या बोलण्याचा पूर्ण बोध झाला.

तिला ठाऊक होते की,.....

तिचे वर्तमान अजून तारुण्याच्या भरात आहे.

तिचे कलानिपुण विभ्रम अजून घायाळ करीत आहेत.

तिचे वाक्चातुर्य अजूनही लाघवी अन्

पिसे लावीत आहे.

तिची नगरवधूता अजूनही मोहकतेच्या

लाडीक हिंदोळ्यावर झुलते आहे.

अशा मंथर वेळी भिक्षूची भेट अनाठायी अन् अप्रस्तुत ठरेल.

तरी त्याचक्षणी तिच्या अंतर्यामी,अतृप्तीची एक अस्फूट कळ उमटली आणि तिच्या हृदयाने ग्वाही दिली की,..आज नाही,...

तरी ती पूरणमासी लवकरच उजाडेल.

तेव्हापासून ती नगरवधू नेहमी आपल्या स्वप्नात गुंगलेली,

पूर्णत्वाची तृष्णा वागवत मृगजळ शोधीत राहिली.

ऋतुचक्र फिरत राहिले. चक्राकार गतीने वसंता मागून ग्रीष्म,ग्रीष्मापाठी वर्षा आणि शारदीय पुनवे पश्चात हेमंत आणि शिशिर येत राहिले.

ना वसंताचा उन्मेष,

ना ग्रिष्माची दाहकता,

ना वर्षेची तृप्ती,..

ना शरदाची निर्मलता,

ना हेमंताची शिरशिरी,

ना शिशिराची पानगळ.

बदलता निसर्ग तिला ना खुणावत होता,

की तिच्या बावऱ्या मनाला,ऋतू जोजवू शकत होते.

आता तिच्या गाण्यात,ना गंधार रंगत होता,

ना पदन्यासातील ताल,तोल धरत होता.

ना तिच्या रसनेला स्वादाची चाड होती,.. आणि ना मनाला सुकून शांती !

सदा सर्वदा महालाच्या अंतःपुरात,ती आपल्याच नादात हरवून,जागत राहिली

तो भिक्षू परतून नगरात दिसला नाही.

तो कुठे गेला याचा ठावठिकाणाही

कुणाला नव्हता.

तसंही,ती नगरवधूही त्या भिक्षूची वाट पाहत नव्हतीच.

तिच्या स्मृतीपटलावर त्याचा चेहरा उमटतही नव्हता.

तिला आठवत होती त्याची शांत स्थिर नजर आणि धीरगंभीर स्वर!

आकार,उकार..विकार सारे काही निमाले होते .....

उरली होती फक्त केशरी आभा,त्याच्या संसंज्ञ साक्षीत्वाची.

तिला मोह होता त्या केशरियाचा.

आताशा आकाशातील पहाटेचे केशरीरंग तिला खुणावत होते.

भोवतालच्या विविध फुलातील,गेंदेदार फुलांनी तिचे लक्ष वेधून घेतले होते.

केशरी देठाची,नाजूक,गंध भारली..इवली पहाट फुलं,तिला खुणावत होती

आणि पुनवेचा केशरी चांद तिला जणू भेटीचे आमंत्रण देत होता .

अशाने नवरसांतील ओलावा कसा टिकणार ?

नवरात्रींचा उत्सव कसा सजणार ?

अन् नवविधा शृंगार कसा बहरणार ?

ती नव्हती तरी रंगमहालांच्या पत्रिकेत उत्सव आणि भावगुंजन लिहिलेलेच होते.

त्यानुसार तिची जागा कुणीशी घेतली

अन् रंगमहाल सजतच राहिले....

आणि अशाच एका संकल्पित क्षणी,..

सखीची सोबत न घेता,ती निघाली,..

केसरियाच्या शोधात.

दहा कमानी,दहा द्वारे,ते महाल,ती नगरी..

हे तर तिला नित्य परिचित,

पण आज मात्र ते सारे,अनोळखी अन् परके झाले होते.

त्यांच्यात गुंतलेले मन आता उडू उडू

पाहत होते.

त्यांतील कुंठलेली गती आता वेग घेऊ  पाहत होती.

तिथे साकळून राहिलेले जीवन आता

प्रवाहीत होऊ पाहत होते.

ती निघाली या साऱ्यांपासून दूर.

पण कुठे ?

ते तर तिलाही ठाऊक नव्हते.....

पण ती चालत राहिली.
नगरीतून भिरभिरत,
एक एक कमान आणि दहा वेशी,
ओलांडून ती चालत राहिली.

जेव्हां तिच्या या देहाच्या प्रवासात,

प्रत्यक्ष नगरी मागे राहिली

अन् मनाने तर ती नगरीपासून कित्येक योजने दूर आली होती...,

तेव्हां ती अशा एका प्रदेशात पोहोचली की तिथले काहीच तिच्या परिचयाचे नव्हते..

सारेच नवे,..पण विलक्षण ओढ लावणारे.

नजरेने ओळख नाकारली तरी हृदयात जागणारे ऋणानुबंध ..तिला पुढे पुढे घेऊन जात राहिले.

अगदी सहजतेने ती विहरु लागली.

जणू कधी काळी तिचे वास्तव्य,

तिथे घडले होते.

निरभ्र निलीम आकाश,

लवलवता हिरवा सभोवार,

मोकळा श्वास,मोकळा प्रवास..,

आणि स्वतःची साथ.

सभोवती निसर्ग बहरला आहे.

रंग उधळले आहेत.

दरवळत्या सुगंधी हवेत मख्मली स्पर्श आहे आणि ती केवळ अनुभवते आहे

ती या सर्वांशी एकरुप आहे,तरी

कोणतेच भावतरंग आता उमटत नाहीत.

प्रिय अप्रिय, हवे-नको, चांगले-वाईट,

आशा आकांक्षा स्वप्न ...यांच्या मायाजाला पलीकडे,..केवल आनंदविभोर स्थिती..

ती अनुभवते आहे.

तरल अंतस्थ प्रेरणा तिला सहज,अनायास

प्रवास घडविते आहे...

अशातच घटिका पळं प्रहर..दिवस लोटले.

ती चालतच राहिली ...

आणि अंतिमतः एका कातरवेळी,..

त्या तळ्याकाठी येऊन थबकून राहिली.

शांत..निर्जन..परिसर,नि:शब्द हिरवाई

नितळ..नि:स्तब्ध स्फटिक जल,...

गडद निळ्या आभाळात भले थोरले बिंब

आणि जलाशयाच्या मध्यावर,पूर्णत्वाला आसुसलेले,चंद्रविकसिनी कमलिनींचे अर्धोन्मिलीत कळे...!

ती पार हरखली,..

भारलेल्या मनाने,स्वतःभोवती सावकाश

गिरकी घेत,तिने तो सारा परिसर,एकवार न्याहाळला...आणि तिला खूण पटली..

हेच ते, ज्याचे स्वप्न पाहिले होते..

हेच ते, ज्याचे ध्यान केले होते...

हेच ते,ज्यासाठी जीव झुरणीला लागला होता.तेच हे,जे सापडले होते...!!

आता,त्या शांततेची मोहिनी..अंमल दाखवू लागली होती

त्या स्तब्धतेचे गारुड .. हळूहळू पसरु लागले होते

वातावरणाचे संमोहन आत आत भिनू लागले होते.

तिने पाहिले,उंचावरचे सस्मित पूर्णबिंब

एकटक जणू तिलाच निरखित होते ..

तिने त्या नजरेतील आमंत्रण ओळखले.

ती पुढे झाली..

तळ्याच्या पाण्याचा गार स्पर्श झाला..

तेव्हा तेच बिंब,डहुळलेल्या पाण्यातून तिला खुणावू लागले.

आलटून पालटून बिंब..प्रतिबिंबाच्या नजरबंदीत ती हरवली.

पुन्हःपुन्हा त्याच खेळात रमत,

ती हळूहळू तळ्यात उतरली.

तळ्याच्यामधोमध कमलिनींचे कळे,

आता उमलू लागले होते...

जणू त्या चन्द्रमाधवीच्या प्रदेशात,

तिच्या हृदयीची उत्स्फूर्त अभिलाषा,.

आता मूर्त होऊ घातली होती.

आणि खरोखरचं,त्या भावगर्भ वेळी,

वैशाख पुनवेची ती कौमुदी रात्र,

ऐन भरात असताना,...

त्या तळ्याकाठी,गर्द वृक्षातळी,

अस्पष्टशा ध्यानस्थ आकृतीच्या साक्षीने,

भल्याथोरल्या केशरीबिंबातून पाझरणारे आटीव चांदणे प्राशून,

त्या नगरवधूची जीवेष्णा तृप्त झाली..!

आणि तेव्हां,कोण्या एका आटपाटनगरीची,

ती रुपगुणसंपन्न,सुखलोलुप अभिसारिका,

स्वत्व विरुन....मुक्त झाली. !!

-मुकुला राणे नवलकर

# माझे पुस्तकप्रेम

**संजय शरद दळवी**



पानांच्या बंधनात, जग उलगडते, जिथे शहाणपण विसरून स्वप्नेच राहतात.
वाचनाने एक प्रवास सुरू होतो, पुस्तकांमध्ये जीवनाचे सर्वोत्कृष्ट सार सापडतात.

वयाची पासष्ठ सहासष्ट वर्षे कशी भुर्रकन उडून गेली ते कळलेच नाही. नेत्र अगदीच काही पैलतीरी नाही लागलेत माझे, पण पुलाखालून वाहून गेलेल्या पाण्याचा हिशोब हल्ली राहत नाही, हेच खरे. त्या खळाळणाऱ्या निर्झराला ठायी ठायी अडवणाऱ्या आठवणी मात्र बेसुमार आहेत. अगदी लहान असतानाचे जाऊंदे, पण वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षांपासूनच्या, भले धूसर का असेनात, पण आठवणींनी आज फेर धरलाय माझ्या मनात. किंग जॉर्जच्या मराठी माध्यमात एक वर्ष काढलय मी. ताराबाई मोडक त्यावेळी शाळेत शिकवत असलेल्या अश्या अंधुक आठवतायत. संपूर्ण रामायणाचा संक्षिप्त असा एकपात्री छोटेखानी प्रयोग माझ्या धाकट्या आत्याने बसवून घेतला होता जो मी शाळेत सादर केला होता. त्या नंतर माझी शाळा बदलून बाबांनी मला दादरच्याच डॉक्टर अँटोनियो डा'सिल्वा मध्ये दाखल केले आणि माझा इंग्रजी माध्यमाचा अभ्यास सुरु झाला. घरी पूर्ण मराठी साहित्यिक वातावरण. बाबा, आत्या, काका, सारेच साहित्य प्रेमी. त्यामुळे शाळेत इंग्रजी ए बी सी डी शिकताना घरीच माझ्या आत्याने मराठी मुळाक्षरे घोटवून घेतली. शाळेत मला मराठी हा विषय कधीच नव्हता. मी इंग्रजी, हिंदी आणि फ्रेंच भाषा घेऊन दहावी पास झालो, तर इंग्रजी व हिंदी माझ्या समवेत बारावी पर्यंत बागडल्या. पुढे सायन्स शाखेत प्रवेश घेतला आणि भाषा आमच्या अभ्यासक्रमातून बाद झाल्या. खरे नाही वाटणार आज, पण मी पहिलीत असताना बाबासाहेब पुरंदऱ्यांचे राजा शिवछत्रपती वाचले होते. तिसरीत असतानाच मी शिवाजी सावंतांचे मृत्युंजय वाचून काढले होते, व आजतागायत त्याची किती पारायणे केली आहेत ह्याची गणतीच नाही. रणजित देसाईंच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेल्या त्या वेळच्या दोन महा खंडात प्रसिद्ध झालेल्या श्रीमान योगीची अनेक पारायणे केली होती. नंतर तर मी वेड लागल्यासारखा वाचत सुटलोय ते अगदी आजतागायत. बाबांची एक सवय होती. ते संग्राह्य पुस्तके विकत आणीत आणि आता हा वारसा मी सुद्धा पुढे चालवलाय. त्यामुळे देसाईंच्या स्वामी सारख्या पुस्तकांची आमच्या घरच्या संग्रहात सतत भर पडत गेली, व ती आजही माझ्याजवळ आहेत. स्वामी पहिल्या माधवरावांवरचे. ना. सं. इनामदारांचा राऊ थोरल्या बाजीरावाचा, तर मंत्रावेगळा शेवटच्या बाजीरावावर. औरंगझेबावरचे शेहनशाह तर पार्वतीबाई सदाशिवरावभाऊ पेशव्यांच्या जीवनावर बेतलेले शिकस्त, साऱ्या साऱ्यांनी माझ्या मनावर गारुड केले. ह. ना. आपटे, वि. वा. हडप, नाथमाधव, ह्यांची सारीच पुस्तके अजूनही आहेत माझ्याकडे. टारझनचे सोळा भाग, हडपांचे पेशवाईवरचे वीस भाग, नाथमाधवकृत स्वराज्याचे सात भाग, गो. ना. दातार ह्यांच्या कालिका मंदिर, प्रवाळ द्वीप, विलास मंदिर, बंधू द्वेष, शाप विमोचन, रहस्य भेद, इंद्रभुवन गुहा आदी कादंबऱ्या. प्रत्येक पुस्तक मी आज पावेतो शेकडो वेळा वाचले असेन. तरुणपणी हे ही कळले की गो. ना. दातार ह्यांच्या साऱ्या कादंबऱ्या रेनॉल्ड्सच्या कादंबऱ्यांची मराठीमय भाषांतरे आहेत म्हणून, पण त्या मुळे त्यांची गोडी जराही कमी होत नाही. रहस्यकथा तर अक्षरशः हजारो वाचल्या असतील मी. चंद्रकांत काकोडकरांच्या कादंबऱ्या चवीने वाचण्याच्या वयात सुद्धा मी त्यांच्या एकमेव रहस्यांकीत हिरोच्या, म्हणजे राजाराम राजेंच्या तेव्हढ्याच प्रेमात होतो जेवढी राजारामची सेक्रेटरी कम प्रेयसी सीमा होती किंवा त्याचा तानाजी हा सहाय्यक होता.

हळू हळू पु. ल. वाचले, व. पु, वाचले आणि अक्षरशः भारावलो. वाढत्या वयाबरोबर बाबा कदम आयुष्यात डोकावले, आणि त्यांच्या फौजदारी वकिलीच्या अनुभवातून त्यांनी लिहिलेल्या असंख्य कादंबऱ्या माझ्या संग्रहात समाविष्ठ झाल्या. सु.शी, तथा सुहास शिरवळकर, चिंतामणी लागू, आणि अखेर प्रदीप दळवी. प्रदीप दळवी म्हणजे माझ्या आयुष्यात डोकावलेले एक सुवर्ण पानंच जणू. वासूची सासू सारखे भन्नाट विनोदी नाटक ज्या दळवींनी लिहिले, त्यांनीच मी नथूराम गोडसे बोलतोय सारखे अजरामर नाटक लिहून ठेवलय. त्यांच्या साहित्यकृतीत पसायदान, विजयध्वज, २३ जून, अदेही, सप्तमवेद, रक्तरेखा, आनंदघन, कालांकित, स्वर्गद्वार, मी नथूराम गोडसे बोलतोय, चेकमेट, सागरा अगस्ती आला, मी आहे, तनबीज ही पुस्तके येतात; आणि ह्यावरचा कळस म्हणजे संभवामी युगे युगे व त्याचा दुसरा भाग उष:काल. त्याचा तिसरा भाग म्हणजेच कोटीभास्कर अर्धवट पुरे करून दळवींनी देह ठेवला, हे कळल्यावर माझ्या दुःखाला पारावर उरला नव्हता. संभवामी युगे युगे व उष:काल मध्ये कल्पनाशक्तीचा कहर केलाय दळवींनी. आजच्या युगात कृष्णजन्म घडवून आणलेला दाखवून त्यांनी जे कल्पनाविश्व उभे केलेय त्याला तोड नाही. रक्तरेखामध्ये त्यांनी तानाजी मालुसरेंच्या रक्तरेखा, म्हणजे ब्लडलाईन, आजच्या दिवसाला आणून भिडवलीय. हा हंत हंत!

आयुष्याच्या एका कालखंडात मी वपुंच्या प्रचंड प्रेमात होतो. मी व. पु. काळेंना नेहमीच पत्र लिहायचो. साधारणतः ९० किंवा ९१च्या सुमारास, एका रविवार सकाळच्या भल्या पहाटे, सकाळी ४, ४.३० वाजता माझा फोन वाजला. शिपिंगच्या व्यवसायात असल्यामुळे वेळी अवेळी फोन घ्यायची मला सवयच होती. पहिल्या, दुसऱ्या रिंगलाच मी फोन उचलला. समोरून एक नम्र मुलायम आवाज आला, 'नमस्कार, मी वसंत पुरुषोत्तम काळे बोलतोय'. माझी ट्यूब पेटायला काही क्षण गेले तोच ते पुढे म्हणाले, 'झोपेतून उठवल्याबद्दल क्षमस्व. आत्ताच थोड्या वेळापूर्वी परगावचा कार्यक्रम आटोपून घरी पोचलो, आणि थोडा पत्रव्यवहार चाळला. त्यात तुमचे पत्र मिळाले. खूप छान लिहिले होते. बरोबर तुमचे कार्डही होते, त्यावर तुमचा घरचा फोन नंबर होता. राहवले नाही, म्हणून फोन केला. सॉरी. झोपा आता. उद्या सकाळी दहा वाजता परत बोलू', म्हणून त्यांनी फोन ठेवूनही दिला. माझी मात्र झोपच उडाली. वपुंनी मला फोन केला, मला! बाजूला साखरझोपेत असलेल्या पत्नीला उठवून सांगावेसे अशी उर्मी मनात दाटून आली होती, पण मी आवरले स्वतःलाच, आणि परत निद्रादेवीची आराधना करण्याचा निष्फळ प्रयत्न करीत राहिलो. सकाळी लवकर उठून सारे आटोपून मी वपुंच्या फोनची वाट पाहत बसलो होतो. दहा, साडेदहा वाजले पण फोन काही आला नाही, शेवटी कंटाळून अथवा न राहवून, मीच त्यांना फोन केला. वपुंनीच उचलला, पण रात्रीचा नम्र मुलायम स्वर आता एकदम रुक्ष होता. माझे नाव ऐकल्यावर ते म्हणाले की मी आत्ता थोडा बिझी आहे, सायंकाळी सात नंतर फोन करा, असे म्हणत त्यांनी फोन कट केला. प्रचंड नाराजी दाटून आली होती तेंव्हा माझ्या मनात. रामप्रहरी फोन त्यांनीच केला होता, सकाळी बोलू असे तेच म्हणाले होते, मग आता असे का हा प्रश्न मला छळत राहिला. मीही मग ठरवले की आपण फोन नाही करायचा म्हणून. आणि काय सांगू महाराजा, संध्यकाळी साडेसातच्या ठोक्याला घरचा फोन वाजला जो मी पटकन उचलला. समोर वपुच होते. म्हणाले, 'काय, सकाळी माझा खूप राग आला ना, काय करू, कथाकथनाच्या कार्यक्रम मागायला त्या फलाण्या गावाचे सरपंच आले होते, व्यवहाराच्या रुक्ष बोलण्यात मला तुमचा वेळ घ्यायचा नव्हता, आता बोला' आणि मग मस्त गप्पा रंगल्या, अगदी पार नऊ सव्वानऊ पर्यंत.

पुन्हा बोलण्याचे आश्वासन देऊन अखेर आमच्या गप्पा संपल्या. आणि मग मी त्यांना लिहिलेले पत्रे आणि उलट टपाली त्यांचे येणारे फोन असे हे सत्र सुरूच राहिले, वर्षानुवर्षे. त्यांच्याच एका गोष्टीतल्या उल्लेखावरून, प्रत्येक पत्राच्या शेवटी मी वहिनींची चौकशी करीत असे. काही वर्षांनी, एका दसऱ्याच्या दिवशी त्यांचे एक पत्र मला मिळाले. त्यात एक छोटी पुस्तिका होती ज्याचे नाव होते 'वाट पाहणारे दार'. त्याबरोबर, एक अल्पस्वरूपी पत्र होते.

त्यावर वपुंनी लिहिले होते 'प्रिय संजय, आता ह्याच दारातून पल्याड जायचे वेध लागले आहेत. ह्या दारातून पल्याड गेल्यावर तुमचा निरोप तिला देईन. आपला, व. पु. काळे.' त्यांच्या पत्नीचा अंतःकाल झाला होता, आणि तिच्या आठवणीसाठी वपुंनी लिहिलेली ही कविता, 'वाट पाहणारे दार'. सुरुवातीसच वपु लिहून गेले आहेत, की ह्या क्षणी केवळ कविताच जवळची वाटली म्हणून कविताच लिहिली. कवितेचे पहिलेच कडवे वाचताना आपलाच श्वास रोखला जातो. 'औषधांचा, उपायांचा, वाया गेला अट्टाहास, नाही परतून आला तुझा सुगंधित श्वास.' वपु आणि माझी मैत्री बहरत गेली. २६ जून, २००१ साली, मी जपानला चाललो होतो, तर सकाळी सकाळीच माझ्या मित्राचा, प्रकाशचा फोन आला, वपु गेले म्हणून. धक्काच बसला.

तसे ते त्याआधी काही वर्षे आजारीच असत, पण असे पटकन जातील असे वाटले नव्हते. प्रकाश वरून आठवण झाली. मराठी मिडीयम मध्ये शिकलेल्या ह्या माझ्या अति हुशार मित्राने मराठीची झूल टाकून इंग्लिश पुस्तके वाचायला केंव्हाच सुरुवात केली होती. तो मला सतत सांगत असे की ‘अरे, इंग्लिश पुस्तकांची झेप खूप मोठी आहे म्हणून’. तशी मी थोडी फार इंग्लिश पुस्तके वाचीत असे, पण प्रकाश मुळे मी हळू हळू पण निश्चितपणे इंग्लिश पुस्तकांकडे वळलो आणि मनोरंजनाचा एक खजिना माझ्यासाठी उघडला गेला. भस्म्या रोग झाल्याप्रमाणे मी पुस्तके वाचू लागलो. आर्थर हेली, जॉन ग्रिशम, विलियम के, चार्ल्स डिकन्स, जॉन फॉवल्स, मार्क ट्वेन, विल्यम फाल्कनर, जॅक लंडन, जॉर्ज आर.आर. मार्टिन, जे.के. रोलिंग, जेफ्री आर्चर आणि माझा सर्वात लाडका लेखक डॅन ब्राउन.

डॅन ब्राउन हा एक परिपूर्ण, अलौकिक आणि बुद्धीमंत लेखक आहे. जेव्हा मी त्यांचे एखादे पुस्तक वाचून हातावेगळे करतो तेव्हा प्रत्येक वेळी मला प्रामाणिकपणे आश्चर्य वाटते कि डॅन ब्राउन, त्याने लिहिलेल्या प्रत्येक पुस्तकात, त्या गूढ भासणाऱ्या, निर्जीव अश्या त्या वळणा वळणांच्या दुर्बोध लिपीतून इतके मनोरंजक चित्र पुन्हा पुन्हा कसे काय उभारू शकतो? पुस्तक एकदा का तुम्ही हातात घेतले तर ते खाली ठेवणे अक्षरशः अश्यक्यच होते; त्याचे एकूण एक पुस्तक आज माझ्या संग्रहात आहे.

अमेरिकन कादंबरीकार आणि पटकथा लेखक जॉर्ज आर.आर. मार्टिन यांच्या महाकाव्यवजा काल्पनिक कादंबऱ्यांची 'ए गेम ऑफ थ्रोन्स' हि मालिका आहे. त्यांनी १९९१ मध्ये या मालिकेचा पहिला खंड लिहायला सुरू केला आणि तो १९९६ मध्ये प्रकाशित झाला. मार्टिन, ज्याने सुरुवातीला या मालिकेची ट्रायोलॉजि म्हणून कल्पना केली, पण त्याने शेवटी सात खंड प्रकाशित केले आणि आठवा खंड मात्र आजही लिहिलेला नाही. तद्वतच 'हॅरी पॉटर' ही ब्रिटिश लेखक 'जे.के. रोलिंग' यांनी लिहिलेल्या सात काल्पनिक कादंबऱ्यांची मालिका आहे. या कादंबऱ्यांमध्ये हॅरी पॉटर या तरुण विझार्ड आणि त्याचे मित्र, हर्मिओन ग्रेंजर आणि रॉन वेस्ली यांच्या जीवनाचे वर्णन केले आहे, जे सर्व हॉगवर्ट्स स्कूल ऑफ विचक्राफ्ट अँड विझाड्रीचे विद्यार्थी आहेत.

मुख्य कथेत हॅरीचा, लॉर्ड वोल्डेमॉर्ट, अमर होण्याचा इरादा असलेला विख्यात पण कुप्रसिद्ध जादूगार, जादूचे मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणार्या विझार्ड प्रशासक मंडळाचा पाडाव, आणि सर्व जादूगार आणि मग्गल्स (जादुई नसलेले लोक) यांच्याशी झालेल्या संघर्षाशी संबंधित आहे.

सुरुवातीस लेखिकेला ह्या पुस्तकासाठी प्रकाशक मिळत नव्हता, पण 'हॅरी पॉटर आणि फिलॉसॉफर्स स्टोन' ही पहिली कादंबरी २६ जून, १९९७ रोजी प्रसिद्ध झाल्यापासून, पुस्तकांना जगभरात प्रचंड लोकप्रियता, सकारात्मक पुनरावलोकने आणि व्यावसायिक यश मिळाले आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रौढ प्रेक्षक तसेच तरुण वाचकांना आकर्षित केले आहे आणि त्यांना आधुनिक साहित्याचा आधारस्तंभ मानले जाते. फेब्रुवारी २०२३ पर्यंत, पुस्तकांच्या जगभरात ६०० दशलक्ष प्रती विकल्या गेल्या आहेत, ज्यामुळे ती इतिहासातील, सर्वाधिक विकली जाणारी पुस्तक मालिका बनली आहेत आणि ती ८५ भाषांमध्ये उपलब्ध आहेत. शेवटच्या चार पुस्तकांनी सलगपणे इतिहासातील सर्वात जलद विकली जाणारी पुस्तके म्हणून विक्रम प्रस्थापित केला, अंतिम हप्त्याच्या प्रकाशनाच्या चोवीस तासांच्या आत युनायटेड किंगडममध्ये अंदाजे २.७ दशलक्ष प्रती आणि युनायटेड स्टेट्समध्ये ८.३ दशलक्ष प्रती विकल्या गेल्या. २०१६ मध्ये, हॅरी पॉटर फ्रँचायझीचे एकूण मूल्य $२५ अब्ज इतके अंदाजे होते, ज्यामुळे हॅरी पॉटर आतापर्यंतच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या मीडिया फ्रँचायझींपैकी एक बनले.

माझा अजून एक लाडका लेखक म्हणजे आर्थर फ्रेडरिक हेली, हे एक ब्रिटीश-कॅनेडियन कादंबरीकार होते ज्यांच्या अकरा पुस्तकांचा जगभर उदो उदो झालाय. हॉटेल, एअरपोर्ट, व्हील्स, द मनीचेंजर्स आणि ओव्हरलोड यांसारख्या सर्वोत्कृष्ट विक्री करणाऱ्या त्यांच्या पुस्तकांच्या ३८ भाषांमध्ये १७० दशलक्ष प्रती विकल्या गेल्या आहेत. त्यांनी त्यांची पुस्तके ज्या प्रकारे विविध उद्योगांच्या पार्श्वभूमीवर लिहिली ते बघून आपण विस्मयचकित होत जातो. केव्हढा वेळ लागला असेल ह्या माणसाला एव्हढ्या विविध उद्योगांचा अभ्यास करायला, आणि त्याआधी, अश्या सुरस आणि रसभरीत कथानकांचे विचार करून छोट्या छोट्या गोष्टींतून एव्हढ्या मोठ्या कादंबरीमध्ये त्याचे रूपांतर करणे म्हणजे आभाळाला गवसणी घालण्या सारखेच होते. 'एअरपोर्ट' पासून 'व्हील्स' पर्यंत आणि 'इन हाय प्लेसेस' पासून 'हॉटेल' पर्यंत, आर्थर हेलींनी उभ्या केलेल्या चित्तथरारक मायावी दुनियेत आपण कधी रंगून जातो ते कळत सुद्धा नाही.

पाहिलंत ना, पुस्तकांबद्दल बोलायला वा लिहायला लागलो तर कसा वहावत जातो ते. पण काय करू, ही पुस्तकेच माझा श्वास आहेत. त्यांनीच मला जगायला शिकवलंय, हसायला शिकवलंय, चालायला शिकवलंय.

नाहीतरी काय, दोन दिशांचे, दोन घडीचे, दोन प्रवासी,

आले, गेले, हसले, रुसले, भांडले, तंडले,

क्षणिक असल्या ह्या संध्येच्या क्षितिजखुणा. कशी कळावी महती त्यांना,

मर्मबंधातल्या अमुखरित ह्या अनुबंधाची

In pages bound, worlds unfold, where dreams and wisdom brightly hold.
With every read, a journey starts, in books, we find life's finest parts.

# बहु असोत सुंदर..संपन्न की महा..!

**मुकुला राणे नवलकर**



राकट देशा,कणखर देशा,दगडांच्या देशा..

असं ज्याचं वर्णन केलं गेलं आहे ,...

तो दख्खनचा अधिपती..महाराष्ट्रदेश.

ज्याची काळ्या कातळाची निधडी छाती,

अजस्त्र फत्तरांचे बलदंड बाहू आणि

रक्तात उकळता लाव्हारस,प्रवाहित आहे .

याचा परिसर,शौर्याने धगधगता आणि वीरश्रीच्या चित्कारांनी दुमदमतो आहे.

अंतःकरणातील विजिगिषेला टाच मारीत, झंझावाती दौडत जाणाऱ्या,...दिग्विजयी टापांनी घुमतो आहे.. गुंजतो आहे.

त्याच महाराष्ट्रदेशात,लोण्याहून मृदु आणि फुलाहून कोमल हृदयभावी, संतमंडळाने फुलविलेला,भक्तिचा मळा ही बहरला आहे

१३व्या शतकाच्या आरंभापासून १७व्या शतकाच्या अखेरपर्यंत महाराष्ट्रदेशाच्या,

सामाजिक जीवनात,

ऐतिहासिक आणि आध्यात्मिक स्तरावर लक्षणीय स्थित्यंतरे घडली,

ज्याकारणे या भूभागाची,राजकीय,

सामाजिक आणि सांस्कृतिक उत्थापनासह

मौलिक उन्नतीही झाली.

त्याही आधी इसवीसन पूर्व 200 पासून पुढचा काळ हा राजकीयदृष्ट्या,

जनतेच्या सहनशीलतेचा अंत पहाणारा जरी असला तरी,

आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत जागरुक प्रबोधन आणि प्रचार, प्रसाराचा होता.

उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् |

वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र सन्ततिः ||

असे आर्यावर्ताचे वर्णन करणारा उल्लेख

थेट विष्णू पुराणात सापडतो.

अखंड आर्यावर्तात उत्तरेत नांदणारी

सिंधु संस्कृती.

सुवर्णयुग म्हणून गौरविण्यात आलेली,

गुप्त आणि मौर्य राजवट.

तेव्हाच्या महाराष्ट्रासह दक्षिणेतील सातवाहन,वाकाटक,चालुक्य,राष्ट्रकुट, देवगिरीचे यादव अशी ....

अखंड पराक्रमी,कलासक्त आणि धार्मिक परंपरा जोपासणारी राजघराणी,

त्यांची स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवर

परस्परांशी बदलती समीकरणे यांची,

इसवी सन पूर्व दोनशे ते पुढील दोनशे अश्या एकुण चारशे वर्षांच्या इतिहासात, नोंद सापडते.

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून वायव्येकडून आक्रमणे झाली;ती अगदी सतराव्या शतकादरम्यान मुघलसत्ता स्थिर होईस्तोवर साल..दरसाल चालू होती..

या दरम्यान हिंदवी स्वराज्य स्थापना आणि छत्रपतीशासित व्यवस्थापन,..

ही श्रींची इच्छा मूर्तरूपास आणून,

महाराष्ट्रदेश आणि मरहट्टे,...

शौर्य आणि श्रध्दा यां मंगल संगमाचे साक्षीदार झाले.

याच काळात, म्हणजे साधारण इ.स पूर्व 200 पासून पुढचा काळ, सर्व सामान्य माणसाला, रोजच्या जीवनात, दैनंदिन व्यवहारात सुखशांती मिळावी यासाठी आध्यात्मिक स्तरावरील प्रयत्नही केले जात होते.

त्या वेळेच्या समाजाला,शैव शाक्त आणि वैष्णव या तीन संप्रदायाच्या एकात्मिक स्वरुपाची ओळख करवून,

समाधानी आयुष्य जगता यावं यासाठी नाथपंथ स्थापन होऊन,

त्याचा फार मोठ्याप्रमाणात प्रसार आणि प्रसिध्दी..,मुख्य नवनाथांनी;तसेच पुढे,

त्यांनी आकारास आणलेल्या नाथसंप्रदायाने केली

त्यासाठी नाथपंथातील प्रमुख नवनाथांनी,

आसेतुहिमाचल आणि वायव्य ते ईशान्य असे पायी भ्रमण केले.

डोंगर आणि दऱ्याखोऱ्यात,जंगलभागात, दूर दूरवर वसलेल्या दहावीस उंबऱ्यांच्या वस्तीत,

उग्र शासनकर्त्यांची मुजोरी आणि अघोरी वळणाच्या अविद्यांचे प्रयोग,..

यांचा उपद्रव सोसत,जीव मुठीत घेऊन दिवस ढकलणाऱ्या भाबड्या माणसांना,

मानसिक आधार आणि सुरक्षिततेचा दिलासा मिळावा म्हणून,..

काळसापेक्ष बोलीभाषेतील,शाबरीमंत्रांची निर्मिती केली

यासंदर्भात सामाजिक जागृती करताना

इसवी सन आठव्या शतकापासून पुढे तेराव्या शतकापर्यंत नाथ संप्रदायाचे बहुमोल योगदान राहिले आहे.

पुढे नवनाथांतील,गहिनीनाथांकडून दीक्षित निवृत्तीनाथ महाराज हे नाथ परंपरेतील अंतिम पाईक होते..

त्यांनी गुरु म्हणून नाथ संप्रदायाचे गुह्य, आपले धाकले बंधू आणि शिष्य

श्रीज्ञानदेव महाराज यांना अवगत केले..

आपली गुरुपरंपरा आपल्या अभंगातून मांडताना ज्ञानोबा माऊली म्हणतात,

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा ।
मच्छिंद्र त्याचा मुख्य शिष्य ।। १।।

मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला ।
गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।।२।।

गहीनिप्रसादे निवृत्ती दातार ।
ज्ञानदेवे सार चोजाविले ।।३।।

वडील बंधू श्रीनिवृत्तीनाथांची शिकवण

शिरोधार्य मानून पुढे ज्ञानदेवांनी,

नाथपंथीय परंपरेनुसार,देह आणि मन.., यावरील संयम,कठोर तपाचरण,हठयोग आदि योगिक क्रिया पध्दती,आत्मसात केल्या.

परंतु सर्वसामान्यांसाठी जीवनविद्येचा बोध करताना,ही योगपद्धती,आचरणास कठीण असल्याने सहसा टाळले जाण्याची शक्यता होती...

म्हणून ते नियमन शिथिलकरित सोपी,

सुलभ,सुटसुटीत अशी केवळ सदाचार,

समता,परोपकार आणि नामस्मरण या गोष्टींनां प्राधान्य देणारी भक्तीची सहजसाध्य वाट चोखाळली..

आणि नागर समाजात,गृहस्थी जगण्याच्या दैनंदिन व्यवहारात चपखल बसेल अशा,

वारकरी संप्रदायाची नव्याने पायाभरणी केली..

त्यासोबतच,पूर्वापार चालत आलेली पंढरीची वारी..पालखी दिंडीसह पुन्हा एकदा रुढ केली.

अशाप्रकारे ज्ञानेशांनी,सनातन संतपरंपरेला

वैशिष्ट्यपूर्ण तत्वज्ञानाची बैठक दिली,.. आणि मळभ दाटून झाकोळलेला भागवत धर्म पुनरुज्जीवित केला..

म्हणजे असं म्हणता येईल की,महाराष्ट्रात राजशकट हाकताना,पराक्रमी शूरवीरांनी

क्षात्रतेजस्वी नेतृत्वाखाली,अटकेपार जरीपटका फडकवला;

तर आध्यात्मिक प्रांतात,संत नामदेव महाराज आणि संत एकनाथ महाराज

यां मंडळींनी वारकरी संप्रदायाची

भागवत पताका पार उत्तरेत नेऊन रोवली.

तात्पर्य सांगायचे तर,या महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी जनता जनार्दनाचे ऐहिक आणि लौकिक हितं तर जपलेच,

त्याजोडीला या सुपीक मातीत रुजून उगवलेली संतपरंपरा...

अखंड वाजती गाजती राखणाऱ्या विष्णूदासांनी,श्रेष्ठ साधुमहात्म्यांनी, जनसामान्यांच्या अंतरंगातील

श्रध्दा आणि भक्ती यांना,सुचारु घाट दिला

आणि तेव्हां महाराष्ट्रधर्मात अर्थात ...

देवधर्म, देशधर्म,कूळधर्म आणि वंशधर्म यांत अनुस्यूत असणाऱ्या ....,

आत्मविश्वास,आत्मनिर्भरता अन् आत्मसन्मान या व्यवहारिक त्रयींसह;

आत्मपरिक्षण,आत्मज्ञान आणि

आत्मप्रचिती..

हा जीवाशिवाचे अद्वैत घडविणारा त्रिमितीय साधना मार्ग,

सुविहीतपणे दिग्दर्शितही केला आहे.

एकुणात,आर्यावर्तातील प्रत्येक शतकी स्थित्यंतरात,

राजकारण आणि सत्ताकारण,तसेच समाजकारण आणि अध्यात्मक्षेत्र

यातही महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे.

कविवर्य श्री.वसंत बापट म्हणतात तसे,..

'दिल्लीचेही तख्त राखितो'..या उक्तीप्रमाणे,प्रांतांच्या सीमा ओलांडून,

बाह्यत: झळाळते क्षात्रतेज आणि जयोत्सुक बाणा;

परि अंतरी परिमळते सौहार्द..मार्दव

श्रध्दा जिव्हाळा,जोपासणारा,

असा हा महानायक महाराष्ट्रदेश..!

वज्राहून कठोर आणि मेणाहूनी मऊ

अश्या परस्परविरोधी भावना एकाच काळजात जोजविणारा,..

इथला राजा आणि इथली प्रजा...!

वीरश्री आणि भक्ती या दोन भक्कम परिमाणांत सहभावाने नांदणारी ही लोकसंस्कृती,

जिथे यश,कीर्ती,सुबत्ता सलोखा,सुसंस्कृत रयत आणि समृद्ध जनजीवन नांदते आहे,

अशा या आर्यावर्तातील अग्रगण्य प्रांताला,

समर्थ रामदासस्वामींनी,काहीं शताब्दींपूर्वी घातलेली साद आठवावी...,

समर्थ म्हणाले होते.....

मराठा तितुका मेळवावा,

महाराष्ट्र धर्म वाढवावा..

आहे तितुके जतन करावे,

पुढे आणिक मेळवावे..

महाराष्ट्र राज्य करावे

जिकडे तिकडे..

ही समर्थ प्रेरणा,आज,आत्ता,या घडीला..

विशेषत्वाने स्मरावी.

कारण,ही समर्थ हाक,

काळाच्या अजस्त्र पहाडातील

दऱ्याखोऱ्यातून,कडेकपारीतून घुमत,

शतकांचे उंबरे ओलांडत,....

वर्तमानातही,प्रतिध्वनीत होते आहे..,

आणि म्हणूनच ....

गीत मराठ्यांचे श्रवणीं मुखीं असो..

स्फूर्ति दीप्ति धृतिहि जेथ अंतरी ठसो..

वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो..

सतत महाराष्ट्रधर्म मर्म मनिं वसो..

देह पडो तत्कारणि ही असे स्पृहा॥ ५ ॥

हे सर्वथैव सत्य आहे आणि याकरिता, ..

महाराष्ट्रदेशाच्या जाज्वल्य अस्मितेला ललकारत,

आणि ललामभूत मरहट्टी अर्थात

महाराष्ट्रीय बाणा उजागर करीत,

स्वत्वाचे स्फुल्लिंग,पुन्हा एकदा चेतावे..

आणि ह्या महन्मंगल महाराष्ट्रदेशास,..

या परम पवित्र,पावन भूमीस,

मानाचा मुजरा करुन,

पुन्हा एकदा तत्पर व्हावे....

आणि येणेप्रमाणे,समर्थ वचन सिध्द करावे,

हे उचीत..!

-मुकुला राणे नवलकर

# News of the Month

- **Pt. Sujan Rane** - On the auspicious occasion of Gudi Padwa Pt. Sujan Rane's book 'My journey of portrait painting' was published on 9th April 2024. Pt. Rane has dedicated this book in the memory of his father Keshavrao Rane who was a renowned portrait painter himself. The book is a compilation of Pt. Rane's paintings of world renowned celebrities and his family. This book is a treasure for art enthusiasts for sure.

- **Mr. Abhay Rao** won India's best CEO for Mercedes-Benz and received the award from German and Indian Board members. This award happens to be the most prestigious award in Mercedes Benz. Mr. Rao is the CEO of Mercedes-Benz BU Bhandari Pune. Congrats Shri Abhay Rao.

- **Prof Suhasini Kirtikar**- Honored and felicitated by Mumbai Marathi Grantha Sangrahalaya. The honor was received at the hands of Dr. Ravindra Shobhane, Akhil Bharatiya Marathi Sahitya Sammelan adhyaksh.

- **Mr Sheetal Talpade** received the Mumbai Marathi Grantha Sangrahalaya Puraskar for Prakash Yojana/ Lighting of Krishna Villa play. The award was received at the hands of Dr. Ravindra Shobhane, Akhil Bharatiya Marathi Sahitya Sammelan Adhyaksh.

- **Tanya Vijayakar** - Tanya Vijayakar's first full Marathi movie as a costume designer released on April 19th. The name of the Marathi movie is - MY Lek, starring Sonali Khare & Umesh Kamat and was directed by Priyanka Tanwar.

- **Sian Lakdawala-** Sian Lakdawala (age 10 years), s/o Rima Dhurandhar Lakdawala, participated at India Cubers League 4.0, held at Phoenix Mall, Pune on Sunday, 14th April 2024. He was the 2nd Runner Up (Silver position) and also the 2nd Runner Up (Silver position) in the Mirror cube.

- **Pathare Prabhu Social Samaj Event** - The 136th Vardhapan din and Puraskar sohala was held on 2nd April 2024 at the Pathare Prabhu Hall in Khar. Adhyaksha was Ex Judge Sow Bhageshree Parikh (nee Dhurandhar).

# Prabhu Tarun Diary

## Academic Milestones

- **Dr. Aatish Pradhan** - s/o Aishaana & Aloke Pradhan -Doctor of Philosophy (PhD) in Chemical Engineering . Aatish has done his thesis in Autonomous Material Development and Optimization based on Inverse Engineering: A "Closed Loop" design for advancing innovation from the University of Buffalo.
- **Abhijit Pradhan** - s/o Bhushan and Kanchan Pradhan- Masters of Science from London School of Economics- in Accounting and Finance.
- **Neeshka Kothare** - d/o Sanjana & Deepak Kothare. Bachelor of Arts in Psychology and English - CGPA 8.14

---

## Thread Ceremony

- **Shwet Priyesh Vijayakar** on 28/4/24

-----------------------------------------------------------------------------------------------------

## Wedding

- **Gandhali Sanjay Dalvi** with **Sankalp Sunil Aamre** on 20th April 2024

---

## Golden Wedding Anniversary:

- **Mr. Satej Jaywant Talpade** and **Meena Satej Talpade** ( Nee:Meena Keshav Kirtikar ) on 13th April 2024

---

# Prabhu Tarun Diary

**Om Shanti. We lost these members in the recent past.**

- Smt. Namita ( Ranjan) Rajendra Nayak - age 71 years passed away on 22/03/2024 at Girgaum, Mumbai
- Tejaswini Pratap Vazkar - age 94 years passed away on 25th February 2024 at Worli, Mumbai.
- Meena Mukund Kothare - age 96 yrs, passed away peacefully on 28th April 2024 at Dombivali,Thane
- Dr.Usha Ramesh Raje née Sadhana Chandrakant Dhairyawan passed away on 28th April 2024 at Roha

# Prabhu Tarun Diary

## Donations

- Rs. 500/- donated by Mrs. Pratima & Mr. Vinod G. Pradhan to celebrate the Ph.D in Chemical Engineering from Buffalo University, U.S.A. completed by their grandson Mr. Aatish Aloke Pradhan.

## Limited Copies

- 100th issue of Prabhu Tarun Diwali magazine is available with Mrs. Surekha Dhurandhar. Interested readers can get in touch with her.

# Credits



**Kalpana Rane**

Editor



**Rohit Trilokekar**

Resident Editor



**Monica Rane Iyer**

Editorial Support



**Sanjana Kothare**

Editorial Support



**Shrinal Kothare**

Design Head



**Sunil Pawar**

Web Master